**महसूल विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक, गट-ब संवर्ग तसेच लघुलेखक गट-क संवर्ग हे संवर्ग "मृत संवर्ग" म्हणून घोषित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : मृतसं-२०२६/प्र.क्र.११५/आस्था-०७**
**हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : ३० जुलै, २०२६.**

**वाचा :** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : प्रानिमं १२२४/प्र.क्र.७०/सेवा-४ (का.१३-अ), दिनांक ०५ मे, २०२६.

**प्रस्तावना** : वाचा येथील सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.०५.०५.२०२६ अन्वये, भरती प्रकियेत सुसूत्रीकरण व सुधारणा करणेबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. प्रशासकीय कामकाजात, शासकीय व्यवहारात माहिती-तंत्रज्ञान कार्यप्रणालीचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढलेला आहे. प्रशासकीय पुनर्रचना, आधुनिक तंत्रज्ञान या पार्श्वभूमीवर काही संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या आता कालबाह्य ठरल्या आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासकीय दृष्ट्या अनावश्यक ठरलेल्या संवर्गांना प्रशासकीय विभागांनी प्रस्तावित केल्यानुसार सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.०५.०५.२०२६ अन्वये "मृत संवर्ग" म्हणून घोषित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-२६ लघुलेखक (मृत संवर्ग) यामध्ये महसूल विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील उच्चश्रेणी लघुलेखक (गट-ब) अराजपत्रित संवर्ग, निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब) अराजत्रित संवर्ग व लघुटंकलेखक, गट-क संवर्ग या संवर्गांचा समावेश आहे. त्यानुसार महसूल विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील उच्चश्रेणी लघुलेखक (गट-ब) अराजपत्रित संवर्ग, निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब) अराजत्रित संवर्ग व लघुटंकलेखक, गट-क संवर्ग हे "मृत संवर्ग" म्हणून घोषित करणेबाबत शासन आता पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

**शासन निर्णय :**

महसूल विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील उच्चश्रेणी लघुलेखक (गट-ब) अराजपत्रित संवर्ग, निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब) अराजत्रित संवर्ग व लघुटंकलेखक, गट-क संवर्ग हे "मृत संवर्ग" म्हणून घोषित करण्यात येत आहेत. सदर मृत संवर्गांमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सेवाविषयक लाभ अबाधित राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्यांचा संकेतांक २०२६०७३०१६४२३७५९४८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAMEER RAMESH DALVI

Digitally signed by SAMEER RAMESH DALVI
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue Department, 2.5.4.20=EC5CD266E548AB04F15AE6CE4DE05C2244562AD52592C29F739895BAB7109CB9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A937D4E8F808398F59B67D3D3E3E7A5AAF17257D2611DE6CCEA14B0234621F61, cn=SAMEER RAMESH DALVI
Date: 2026.07.30 16:43:30 +05'30'

**( समीर दळवी )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मा.मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उपमुख्यमंत्री (रा.ऊ.शु.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
९. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई.
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर.
११. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर.
१२. सर्व विभागीय आयुक्त.
१३. सर्व जिल्हाधिकारी.
१४. सह सचिव (का.१३-अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सह सचिव (का.आस्था-०८), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवडनस्ती - आस्था-०७.